International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly

ISSN – 2347-7075
Impact Factor – 0.899
Vol.2 No.1 Sept - Oct 2014

# नाते मराठी रंगभूमी आणि चित्रपटाचे

प्रा. डॉ. शशिकांत चौधरी

न्यू कॉलेज, कोल्हापूर

मराठी नाटकांचा सुवर्णकाळ म्हणून ज्या रंगभूमीकडे पाहिले जात होते त्या रंगभूमीला उतरती कळा लागली आहे ती चित्रपटाच्या आक्रमनामुळे. कारण 1913 ते 1932 हा मूकपटांचा जमाना होता. या कालखंडात चित्रपट कला नुकतीच अस्तित्वात येत होती. तिच्यात नाविन्य आणण्याचे प्रयत्नही केले जात होते. अशा काळात मराठी रंगभूमी अधिक बहराला आली होती. बालगंधर्व, केशवराव दाते यांच्यासारखे दिग्गज कलाकार आपल्या अभिनयाने मराठी रंगभूमी आणि मराठी प्रेक्षक यांचे मनोरंजन करण्यात गुंतले होते. खानदानी अभिनय, संस्कृतीचा ठसा बालगंधर्वांच्या रुपाने रंगभूमीवर वावरत होता. अशा काळात 1932 मध्ये मराठी मूकपटांना वाचा फुटली. मूक अभिनय करणारी पात्रे बोलतात कशी याचे अप्रुप तमाम मराठी प्रेक्षकांना वाटू लागले. मराठी चित्रपट बोलू लागला आणि मराठी रंगभूमीवरचा प्रेक्षक खेचून घेण्यात चित्रपट माध्यम यशस्वी झाले.

हजारोंच्या साक्षीने घडणारे मराठी नाटक, खानदानी गाणे अभिनयाने वन्समोअर घेत असताना उत्तरात्र संपत आली तरी त्या गाण्याची, अभिनयाची तारीफ करणारे प्रेक्षक केवळ दोन-अडीच तासात संपणाऱ्या चित्रफितीच्या आकर्षणापोटी नाट्यगृहातून चित्रपटगृहाकडे वळले आणि बघता-बघता मराठी रंगभूमीच्या या सुवर्णकाळाला उतरती कळा आली. जाणकार प्रेक्षकांनी रंगभूमीकडे पाठ फिरविली. ज्या नाटककारांनी आपली संहिता लिहून नाटक सादर केले ते लेखकही नाविन्याच्या हव्यासापोटी चित्रपट क्षेत्राकडे वळले याला काळाचा महिमा मानावा लागेल.

नाटक हे लेखकाच्या हातून लिहून पुर्ण होतात ते दिग्दर्शकाच्या हातात येते आणि दिर्ग्दशक सांगतील तसे तालमी करून नाटक सादर करण्यात कलाकार यशस्वी होतात. त्यामुळे कालचा खेळ आज रंगेलच असे नाही किंवा अधिकच रंगेल कारण नाटक हे शेवटी प्रयोगमूल्य आहे. नानाविध प्रयोग यातून सादर केले जातात. जीथे लेखकाचे काम संपते तिथे दिग्दर्शकाचे सुरू होते. जिथे

दिग्दर्शकाचे काम संपते तिथे नटाचे सुरू होते. हजारो प्रेक्षकांच्या साक्षीने हा नाट्यप्रयोग सादर होतो. ज्याला लाईव्ह अभिनय म्हणतात तो इथेच पहायला मिळतो. पण चित्रपटाचे तसे नाही कारण हे माध्यम वेगळे आहे.

लेखकाच्या मूळ कथेची पटकथा तयार केली जाते त्या पटकथेला अनुसरून संवाद लिहिले जातात, गीतरचना केली जाते, संगीत दिले जाते, मर्यादित तंत्रज्ञांच्या समोर केला गेलेला हा अभिनय तुकड्या-तुकड्यांनी चित्रित केला जातो. त्यांची एकसंघता नंतर साधली जाते त्यातून तो चित्रपट आकारला जातो. पण असंख्य कलांची जोड घेऊन तो उभा राहतो. त्यात नेपथ्य आहे, चित्रकला आहे, वादन आहे, नृत्य आहे, नाट्य आहे, ताल, सूर लय आहे, फोटोग्राफी आहे, स्थळ चित्रण इन डोअर आऊट डोअर स्वरुपाचे आहे. त्यामुळे एखादा चित्रपट एखादा दिग्दर्शक एका महिन्यात चित्रित करतो किंवा त्याला पाच-सहा महिनेही लावतो. कारण कलाकार, तंत्रज्ञांच्या तारखांचा ताळमेळ साधूनच हे काम पूर्ण केले जाते. कारण हे माध्यम शेवटी दिग्दर्शकाचे आहे. लाईव्ह अभिनय येथे अनुभवता येत नाही. पण लखलखत्या या चंदेरी दुनियेची भुरळ मात्र दिवसेंदिवस वाढतेच आहे.

ज्या दिग्गजांनी आपल्या सामाजिक, कौटुंबिक, ऐतिहासिक कलाकृती लिहून मराठी रंगभूमी गाजविली त्याच लेखकांनी रंगभूमी सोबत ही लखलखती चंदेरी दुनिया सुद्धा जवळ केली आणि नाटकाचे तंत्र मुळात आत्मसात होतेच त्यातच थोडा बदल करून चित्रपटाचे तंत्रही आत्मसात करून आपले लेखन केले. अशा काही दिग्गंज नाटककारांच्या नाट्यकलाकृतीवर चित्रपटांची निर्मिती झाली आहे त्यातल्या नाटक चित्रपटांची काही नावे येथे देतो आहे आणि लेखकांची नोंद करतो आहे.

**माया मच्छिंद्र** (1932) :

सिद्ध संसार नाटक, गोविंदराव टेंबे यांची शिवराज नाटक कंपनी हे नाटक करायची. मणिशंकर पागल यांच्या मूळ गुजराती नाटकाचे हे मराठी रूपांतर. यावर चांगला चित्रपट निघेल असे व्ही. शांताराम यांनी म्हटले होते. त्यावर त्यांनी पटकथा लेखन केले, ते मणिपाल यांना दाखविले. त्यांनाही ते पसंत पडले आणि प्रभात फिल्म कंपनीचा व्ही. शांताराम दिग्दर्शित ‘माया मच्छिंद्र’ हा चित्रपट मराठी आणि हिंदीमध्ये प्रदर्शित केला.

**शककर्ता शिवाजी** (1934) :

दिग्दर्शक नागेंद्र मुझुमदार, ‘आमचे इमान’ या नाटकावर आधारीत हा चित्रपट होता.

**चंद्रसेना** (1935) :

दिग्दर्शक व्ही. शांताराम. याचे मूळ लेखक पु. भा. डोंगरे यांनी ‘चंद्रसेना’ हे नाटक लिहिले ते स्वदेश हितचिंतक मंडळी सादर करीत होते. या नाटकावरून प्रभातने हा चित्रपट निर्माण केला.

**साध्वी मीराबाई** (1938) :

हा संतपट होता. याचे निर्मिती संस्था बालगंधर्व आणि रुईकर प्रोडक्शन यांची होती. याचे दिग्दर्शक बाबूराव पेंटर होते. वसंत शांताराम देसाई लिखित ‘अमृतसिद्धी’ या नाटकावरून निर्माण केलेला हा चित्रपट होता. बालगंधर्व यांनी स्त्रीवेशात सादर केलेला हा एकमेव चित्रपट आहे.

**ज्वाला** (1938) :

हंस चित्र, दिग्दर्शक मास्टर विनायक, शेक्स्पीयरच्या मॅक्बेक या इंग्रजी नाटकावरून हा चित्रपट निर्मिला होता.

**म्युनिसीपालिटी / स्थानिक स्वराज्य** (1941) :

याचे निर्माते होते के. नारायण काळे, तर दिग्दर्शक होते बाबुराव आपटे. माधव जोशी लिखित म्युनिसीपालिटी या नाटकावर आधारीत हा चित्रपट होता.

**घाबरायच नाही** (1990) :

दिग्दर्शक व्ही. के. नाईक, शेक्सपीयरच्या ढरपळपस`ष ींहश ीहीशु नाटकावर आधारीत हा चित्रपट सामाजिक चित्रपट होता.

**चौकट राजा** (1991) :

दिग्दर्शक संजय सुरकर, याची मूळ कल्पना ‘बॉन्सॉय’ या नाटकाची आहे. याची निर्मिती स्मिता तळवळकर यांनी केली होती.

**बंडलबाज** (1991) :

दिग्दर्शक एन. एस. वैद्य, आचार्य अत्रे लिखित ‘मोरूची मावशी’ या नाटकावरून बनविलेला चित्रपट होता.

**हाच सुनबाईचा भाऊ (1993) :**

दिग्दर्शक पुरुषोत्तम बेर्डे, 1962 साली प्रदर्शित झालेला 'बायकोचा भाऊ' या चित्रपटावरून 'लहानपण देगा देवा' हे नाटक लिहिले गेले. याचे लेखक होते बाळ कोल्हटकर या नाटकावरूनच 'हाच सुनबाईचा भाऊ' या चित्रपटाची निर्मिती केली आहे.

मराठी रंगभूमीवर सातत्याने लेखन करणाऱ्या काही लेखकांनी आपल्या कथा, कादंबऱ्या, नाटक, लिहित असताना रंगभूमीची जी सेवा केली आहे त्यात मो. गं. रांगणेकर, ह. ना. आपटे, ना. ह. आपटे, द. का. काने, विश्राम बेडेकर, मामा वरेरकर, शिवराम वाशीकर, के. नारायण काळे, शांताराम आठवले, अनंत कानेकर, राम गणेश गडकरी, वि. स. खांडेकर, वि. वा. शिरवाडकर, प्र. के अत्रे, स. अ. शुक्ल, य. गो. जोशी, कवी यशवंत, वि. सि. गुर्जर, वि. वि. बोकील, रॉय किणीकर, वि. स. सुखटणकर, चंद्रकांत काकोडकर, भालजी पेंढारकर, दिनकर द. पाटील, ग. दि. माडगूळकर, नाथ माधव, व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील, म. भा. भोसले, वि. म. कुलकर्णी, ना. सी. फडके, पु. ल. देशपांडे, विभावरी शिरूरकर, सई परांजपे-जोगळेकर, अरविंद गोखले, दत्तू बांदेकर, अण्णाभाऊ साठे, गो. नि. दांडेकर, ग. ल. ठोकळ, मधुसूदन कालेलकर, नामदेव व्हटकर, अण्णासाहेब देऊळगावकर, सु. आ. भावे, प्रबोधनकार ठाकरे, कवी संजीव, पी. सावळाराम, बाळ कोल्हटकर, हिराकांत कलगुटकर, रणजित देसाई, डॉ. सुमती क्षेत्रमाडे, कृष्णा पाटील, वसंत कानेटकर, आय. बारगीर, द. मा. मिरासदार, इंद्रायणी सावकार, शरद निफाडकर, यशवंत पेठकर, द. का. हसबनिस, नाना करमरकर, बाळासाहेब पाटील, पी. बी. पाटील, चंद्रकुमार नलगे, दत्ता कदम, वसुंधरा पटवर्धन, जयवंत वालावलकर, मधुकर अष्टीकर, शकुंतला गोगटे, प्रभाकर तांम्हणे, र. वा. दिघे, ग. वा. ढेरे, दत्ता केशव, मधुकर बावडेकर, अमृता गोरे, बाबा कदम, अनंत माने, मनोहर काटदरे, चंद्रकांत शेटे, विजय तेंडुलकर, वसंत सबनीस, मा. दा. देवकाते, माई ऐतवडेकर, जगदीश खेबुडकर, दत्ता माने, दत्ता खेबूडकर, शरद तळवळकर, वि. वि. बापट, शंकर खंडू पाटील, श्री. ना. पेंडसे, ज्योत्स्ना देवधर, प्रभाकर नायक, राजेश मुजुमदार, सुमती गुप्ते, चिं. त्र्यं. खानोलकर, सुभाष भुरके, अंनत तिबले, आनंद धुमाळ, पितांबर काळे, अरुण साधू, निळू फुले, दिनानाथ रेडेकर, विश्वास सरपोतदार, विश्वास पाटील, उमाकांत कानेकर, उद्धव शेळके, अमृता गोरे, माधव शिंदे, श्री.

म. माटे, अनिल बर्वे, मधुकर तोरडमल, रा. रं. बोराडे, सुषमा देशपांडे, सदाशिव अमरावपुरकर, देवदत्त पाटील अशा एकाहून एक सरस कथा, कादंबरी, नाटक लिहिणाऱ्या लेखक कवींनी नाटक, चित्रपट या दोन्हीही प्रांतात आपल्या व्यक्तीमत्त्वाचा ठसा उमटविला आहे.

मराठी रंगभूमीवर एकेकाळी अधिराज्य गाजविणाऱ्या या लेखक मंडळींनी ज्या तन्मयतेने आत्मियतेने मराठी रंगभूमी गाजविली, जगविली तितक्या तन्मयतेने, आत्मियतेने मराठी चित्रपट सृष्टीची ही लखलखती चंदेरी दुनियादेखील गाजविल्याचे दिसून येते. त्यामुळे मी दिलेली नावांची यादी परिपूर्ण नाही त्यात अजून बऱ्याच लोकांचा नामोल्लेख राहिलेला आहे. पण जे आठवले त्यांचीच येथे नोंद केली आहे. मराठी रंगभूमी, मराठी चित्रपट आपल्या लेखनीने अगदी सहजतेने हाताळणारे हे लेखक आज यातले काही हयात आहेत काही नाहीत पण जे हयात आहेत ते दूरदर्शनचा छोटा पडदा देखील तितक्याच आत्मियतेने सांभाळित असल्याचे दिसून येते कारण याचा मूळ पाया नाटक आहे त्यामुळे नाटक, चित्रपट ते दूरदर्शन मालिका हा त्यांचा प्रवास सध्या सुरू आहे त्यांची नोंद घेणे गरजेचे आहे.

**संदर्भ :**


1) चित्रसंपदा : संपादक, जागतिक मराठी अकादमी, 1989

2) रूपवाणी : संपादक, सुधीर नांदगांवकर, एप्रिल, 1997

3) रुपवाणी : संपादक, सुधीर नांदगांकवर, एप्रिल, 2003